दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर   वर्ष ४ थे   अंक १३० वा मंगळवार दि.२९ ऑक्टोंबर २०२४   पृष्ठे ४   स्वागत मूल्य २ रू.

# प्रचंड शक्तीप्रदर्शनाने महायुतीचे उमेदवार ना. संजय बनसोडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## जनतेने दाखविलेला विश्वास सार्थ करुन दाखविणार – क्रीडा मंत्री संजय बनसोडे







उदगीर / बाबासाहेब मादळे :– हजारोंचा जनसमुदाय सहभागी असलेल्या भव्यदिव्य रॅली द्वारे, शहरातील नागरिकांना अभिवादन करीत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री ना. संजय बनसोडे यांनी महायुतीकडून प्रचंड शक्तीप्रदर्शनाने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. आज उदगीर शहरात पार पडलेली महारॅली ना. संजय बनसोडे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी अशीच होती असा विश्वास ना. बनसोडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आलेल्या माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केला. उदगीर विधानसभा मतदारसंघातुन महायुतीचे उमेदवार राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री ना. संजय बनसोडे यांनी आज सोमवारी माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी ना.संजय बनसोडे यांच्या पत्नी सौ. शिल्पा बनसोडे, माजी आ. गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अफसर शेख, मकरंद सावे, प्रशांत पाटील, खरेदी विक्री संघाचे चेअरमन भरत चामले, वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापुरे, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, भाजपाचे तालुकाध्यक्ष शिवशंकर धुप्पे, शहराध्यक्ष मनोज पुदाले, सुधीर भोसले, शिवसेनेचे नेते ॲड. गुलाब पटवारी, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानी,अमोल निडवदे, विजय बनसोडे, अनिल बनसोडे, मयुर बनसोडे, डॉ. कल्पना किणीकर,महानंदा सोनटक्के, दीपाली औटे, अनिता हैबतपुरे, प्रीती पाटील यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस,भाजप, शिवसेना व रिपाईसह घटक पक्षाचे नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते. राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे हे महायुतीकडून विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याने सकाळ पासूनच नागरिकांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात गर्दी करण्यासाठी सुरुवात केली होती. रॅलीला सुरुवात होण्यापूर्वी ना. बनसोडे यांनी उदागिर बाबांच्या किल्ल्यात जाऊन दर्शन घेतले. त्यांनतर हजरत सय्यद ख्वाजा बादशाह रहेमतुल्ला आलय दर्गा येथे चादर चढवून प्रार्थना केली. यानंतर श्री गुरु हावगीस्वामी महाराज मठ, श्री शंकरलिंग महाराज मठ संस्थान, विश्वशांती बुद्ध विहार, आदी ठिकाणी जाऊन दर्शन घेतले. महारॅली मुख्य रस्त्यावरुन सकाळी १० वाजता निघाली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा बसवेश्वर, छत्रपती शाहु महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला ना. बनसोडे यांनी अभिवादन केले. काल उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सकाळपासून मतदार संघातील नागरिकांची लगबग सुरू झाली. टप्याटप्याने महिला – पुरुष व तरुणांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात जमा होऊ लागले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून भव्यदिव्य रॅलीला सुरुवात झाली. रॅली जसजशी पुढे सरकू लागली तशी तशी रॅलीमध्ये प्रचंड गर्दी वाढत होती. रॅलीची सुरुवात झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकापर्यंत नागरिकांची तुफान गर्दी होती. तब्बल पाच ते सहा तास शहरात रेकॉर्ड ब्रेक नागरिकांची गर्दी होती. यावेळी विविध वेशभूषेतील महिला व पारंपारिक वाद्याने रॅलीची शोभा वाढवली. छत्रपती शिवाजी महाराज चौकात ना.संजय बनसोडे यांच्यासह महायुतीच्या प्रमुख नेत्यांनी उपस्थितांना संबोधित केले.

# महायुतीचे उमेदवार आ. रमेशअप्पा कराड आज उमेदवारी अर्ज दाखल करणार

लातूर / प्रतिनिधी : – लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टी महायुतीचे अधिकृत उमेदवार आ. रमेशआप्पा कराड हे मंगळवार दि २९ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्रीय माजी अर्थराज्यमंत्री खा. भागवत कराड यांच्यासह महायुती मान्यवरांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत विविध विभागाच्या माध्यमातून कोट्यावधी रुपये खर्चाच्या अनेक योजना मंजूर केल्या, वैयक्तिक लाभाच्या विविध योजनेचा गरीब आणि गरजू लाभार्थ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळवून दिला आहे. यामुळे भाजपाकडून उमेदवारी जाहीर होताच अनेकांनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. या मतदार संघात हक्काचा आमदार या भावनेतून आ. रमेशआप्पा कराड यांना सर्वत्र मोठे समर्थन मिळत आहे.

केंद्रीय माजी अर्थराज्यमंत्री खा. भागवत कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड हे मंगळवार २९ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी दहा वाजता उमेदवारी अर्ज दाखल करणार असून याप्रसंगी कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, गोपीनाथ मुंडे ऊसतोड विकास महामंडळाचे अध्यक्ष गोविंदअण्णा केंद्रे, शिवसेना नेते बालाजी काकडे, जिल्हा संपर्कप्रमुख अँड. बळवंतराव जाधव, प्रदेश रिपाईचे चंद्रकांत चिकटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अँड. व्यंकट बेद्रे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, माजी खासदार सुनील गायकवाड, माजी आमदार



शिवाजीराव पाटील कव्हेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाणे, जिल्हाध्यक्ष अफसर बाबा शेख, रिपाईचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे यांच्यासह भाजपा व मित्रपक्ष महायुतीतील सर्व मान्यवर नेत्यांसह पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तेव्हा लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टी, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), रिपाई यासह महायुतीतील सर्व मित्र पक्षाच्या पक्ष पदाधिकाऱ्यांसह लोकप्रतिनिधी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान लातूर ग्रामीण विधानसभा महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

# काँग्रेसची पाचवी यादी जाहीर

मुंबई : मंगळवार दि. २९ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज भरायचा शेवटचा दिवस असल्याने आज सगळ्या पक्षांकडून राहिलेल्या जागांवर उमेदवार घोषित केले जात आहेत. आता काँग्रेसने आपली ५ वी यादी जाहीर केली असून यामध्ये ४ ठिकाणी उमेदवार देण्यात आले आहेत.



काँग्रेसची ४ उमेदवारांची पाचवी यादी १)अकोला पश्चिम – साजिद खान मन्नान खान २) कुलाबा – हिरा देवासी ३)सोलापूर शहर मध्य – चेतन नरोटे ४) कोल्हापूर उत्तर – सौ. मधुरिमाराजे छत्रपती

# निलंगा येथे मंगळवारी महायुतीची आशीर्वाद सभा




निलंगा/प्रतिनिधी :– निलंगा विधानसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार माजीमंत्री आ.संभाजीराव पाटील निलंगेकर मंगळवारी (दि.२९) हजारो नागरिक व मतदारांच्या साक्षीने आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी जेष्ठ नेते भाजपाचे राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे यांची उपस्थिती राहणार असून त्यांच्या उपस्थितीत सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर आशीर्वाद सभेचे आयोजनही करण्यात आले आहे.

या ऐतिहासिक सभेसाठी तीनही तालुक्यातील भजनी मंडळे,गणेश मंडळे, आराधी मंडळे,वारकरी व दुर्गा मंडळे तसेच नागरिक आणि मतदारांना निमंत्रित करण्यात आले आहे. सभेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. भाजपासह महायुतीतील सर्वच पक्षांचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच हजारो युवक–युवती व मतदार यावेळी उपस्थित राहणार आहेत.

प्रचंड जनसमुदायाच्या साक्षीने व त्यांचा आशीर्वाद घेऊन आ. निलंगेकर आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी आ.निलंगेकर यांनी संपूर्ण मतदारसंघाचे दौरे करून नागरिकांचा प्रत्यक्ष आशीर्वाद घेतला आहे. विविध गावात जन आशीर्वाद सभा,नागरिक व मतदारांचे मेळावे, महिला मेळावे,बचत गटांच्या महिलांचे मेळावे, गणेश मंडळाचे पदाधिकारी तसेच युवक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी संवादाचे कार्यक्रम,व्यापारी,वकील तसेच विविध समाज घटकांसोबत बैठका झालेल्या आहेत.

मागील काळात राबविलेल्या विविध विकासकामांची लोकार्पणे व मंजूर झालेल्या योजनांची भूमिपूजने झाली आहेत.वाडी – तांड्यावरील प्रत्येकाचे मत जाणून घेत आगामी कार्यकाळात राबवावयाच्या विकास योजनांचा आराखडा आ.निलंगेकर यांनी तयार केलेला आहे.विकास कामांची गती कायम राखत निलंगा मतदार संघाला नव्या उंचीवर पोचविण्यासाठी ते सज्ज झाले आहेत.

निलंगा,शिरूर अनंतपाळ व देवणी तालुक्याचा समावेश असणाऱ्या निलंगा मतदार संघाचा विकास करण्यासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे. जनतेच्या आशीर्वादानेच या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळालेली आहे.जनतेने आजपर्यंत अपार प्रेम केले आहे.प्रत्येक कार्यात साथ दिली आहे.यावेळीही पुन्हा एकदा आपली साथ आणि सहकार्य तसेच आशीर्वाद अत्यंत महत्त्वाचे आहेत. आजपर्यंत आपण जो विश्वास दाखवला त्या बळावरच ही वाटचाल सुरू असून मंगळवारी होणाऱ्या आशीर्वाद सभेस आपण हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे,असे आवाहन महायुतीचे अधिकृत उमेदवार आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले आहे.

# अर्ज भरताना धिरज देशमुख यांनी समाजातील प्रश्नांकडे वेधले लक्ष

## शेतकरी, मजूर, महिला, सुशिक्षित बेरोजगार युवकाची उपस्थिती



लातूर /प्रतिनिधी :– केंद्र आणि राज्य सरकारच्या जाचक निर्णयांमुळे अडचणीत सापडलेले शेतकरी, मजूर, महिला, सुशिक्षित बेरोजगार युवक यांच्या उपस्थितीत काँग्रेस–महाविकास आघाडीचे 'लातूर ग्रामीण'मधील अधिकृत उमेदवार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे उमेदवारी अर्ज दाखल करून समाजातील विविध प्रश्नांकडे (सोमवारी दि. २८) लक्ष वेधले. भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर रोजी घोषित केलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार राज्यातील सर्वच विधानसभा मतदारसंघातील २० नोव्हेंबर रोजी मतदान होत आहे. अर्ज भरण्याची मुदत मंगळवार, दि. २९ पर्यंत आहे. त्यामुळे सोमवारी, दि. २८ काँग्रेस–महाविकास आघाडीचे 'लातूर ग्रामीण'मधील अधिकृत उमेदवार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी माजी मंत्री, सहकार महर्षी श्री दिलीपराव देशमुख साहेब, लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी मंत्री श्री. अमित विलासराव देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख, सौ. दीपशिखा धिरज देशमुख, लातूर ग्रामीणचे माजी आमदार वैजनाथ शिंदे, श्री दिलीपदादा नाडे जी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, पाशामियाँ शेख, शेतकरी हिरामण आडे, महिला शेतमजूर संगीता टेंकाळे आदी उपस्थित होते. सरकारच्या जाचक निर्णयामुळे शेतकरी शेतमजूर आर्थिक अडचणीत सापडला आहे. त्याच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. सुशिक्षित तरुणांच्या हाताला काम नाही. त्यामुळे जगावे कसे, असा प्रश्न तरुणांसमोर पडला आहे. महिलांवरील अत्याचारात सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे महिलांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण आहे. मजुरांचे प्रश्न रखडलेले आहेत. समाजातील या प्रश्नांकडे श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना लक्ष वेधले. शेतकरी, मजूर, महिला, बेरोजगार युवक यांचे प्रतिनिधी यावेळी हजर होते. त्यांनी श्री. धिरज विलासराव



देशमुख यांना विजयासाठी या वेळी शुभेच्छाही दिल्या. अर्ज भरण्यापूर्वी बाभळगाव येथील श्री महादेव मंदिर, आई जगदंबा मंदिर, श्री मारूती मंदिर, धनेगाव येथील श्री रोकडेश्वर व लातूर येथील श्री साईबाबा मंदिरात जावून श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी मनोभावे दर्शन घेवून आशीर्वाद घेतले. तसेच, बाभळगाव येथील विलासबाग येथे माजी मुख्यमंत्री, लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या स्मृतिस्थळी पुष्प अर्पण करून दर्शन घेतले.

# २०२५ मध्ये देशात जनगणनेला सुरुवात होणार?

नवी दिल्ली : वृत्तसंस्था कोरोनाच्या संकटामुळे २०२१ मध्ये होणारी जनगणना अद्याप सुरू होऊ शकलेली नाही. परंतु आता केंद्र सरकार २०२५ मध्ये भारताच्या जनगणनेला सुरुवात करण्याचे संकेत दिले आहेत. २०२५ मध्ये जनगणनेला सुरुवात केल्यानंतर २०२६ पर्यंत ही जनगणना पूर्ण होण्याचा अंदाज आहे. यासंदर्भात केंद्र सरकारने नियोजन सुरू केले असल्याची माहिती दिली आहे. दर १० वर्षांनी देशातील जनगणना केली जाते. मात्र, कोरोनाच्या काळात २०२१ ची जनगणना लांबणीवर पडली होती. त्यानंतर आता केंद्र सरकार २०२५ मध्ये जनगणना करणार असल्याची माहिती समोर आली आहे. केंद्र सरकारने या संदर्भात अद्याप अधिकृत कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, २०२५ या वर्षापासून केंद्र सरकार जनगणनेला सुरुवात करणार असल्याचे सांगितले जात आहे. जर केंद्र सरकारने २०२५ मध्ये जनगणना करण्यास सुरुवात केली तर २०२६ पर्यंत पूर्ण होऊन त्या जनगणनेचा अंतिम अहवाल २०२६ मध्ये येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे जनगणनेनंतर भारताच्या लोकसंख्येचा खरा आकडा समोर येणार आहे. आता सध्या देशाची लोकसंख्या १४० कोटी असल्याचे सांगितले जात आहे. परंतु जनगणनेनंतरच देशाच्या लोकसंख्येचा खरा आकडा समोर येऊ शकतो. या अगोदर २०११ मध्ये देशात जनगणना झाली आहे. १३ वर्षांत लोकसंख्येत मोठा बदल झाला आहे. त्यामुळे अधिकृत आकडा वेगळा असू शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे. २०२१ मध्ये देशाची जनगणना झाली नव्हती. कोरोनाच्या कारणामुळे ही जनगणना होणे शक्य नव्हते. त्यामुळे ही प्रक्रिया लांबत गेली. आता २०२४ संपत आला तरीही त्याचे नियोजन होऊ शकले नाही. परंतु आता २०२५ मध्ये त्याबाबत नियोजन करण्यात येत असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. जर जनगणना झाली तर जनगणना चार वर्षे लांबणीवर पडेल.

## संपादकीय....

# ‘रेमिनी’ कुरूप पण गोंडस

स्वतःचे फोटो ‘रेमिनी’ सारख्या ॲप्सच्या मदतीने थोडे कुरूप करून ते सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर शेअर करणार्यांची संख्या वाढत आहे. ही कुरूपता स्वीकारण्याच्या दिशेने असलेली योग्य वाटचाल आहे का? काही लोकप्रिय सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर इन्स्टाग्राम तसेच फेसबुकमधील छायाचित्रात अति सुंदर दिसतात. परंतु, दैनंदिन जीवनात, रस्त्यावरून चालताना हेच लोक दिसले, तर ते बिलकुल आकर्षक वाटत नाहीत. थोडक्यात सांगायचे तर, व्हर्च्युअल जगातील फोटोत दिसणारा ताजातवाना, तरुण आणि टवटवीत चेहरा खर्या जगात वेगळाच वाटतो. मग यांच्या व्हर्च्युअल सुंदरते मागचे गुपित आहे तरी काय? फोटो किंवा व्हिडिओमध्ये ही सुंदरता येते इमेज फिल्टर ॲपद्वारे. फिल्टर ॲप्सच्या मदतीने फोटोत शरीर सडपातळ दाखवता येते. डोळे हिरवे, तपकिरी किंवा निळे होऊ शकतात. अगदी कातडीवरील सुरकुत्या एडिट करून काढून टाकता येतात. एका अंदाजानुसार, ६०० दशलक्षांपेक्षा जास्त वापरकर्ते त्यांची छायाचित्रे फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर पोस्ट करण्यापूर्वी फिल्टर वापरून एडिट करतात. त्यांची स्वतःला अधिक सुंदर दाखविण्याची, फॉलव्हर्स वाढविण्याची शर्यत सुरू असते. पण, वारंवार सुंदर, अट्रॅक्टीव्ह फोटो पाहिल्याचे नकारात्मक प्रभाव आहेत. ऑस्ट्रेलियन संशोधक झो ब्राउन आणि मारिका टिगेमन यांनी केलेल्या अभ्यासात हे परिणाम शक्य तितक्या सोप्या पद्धतीने मांडले आहेत. ‘अट्रॅक्टीव्ह सेलिब्रिटी अँड पीअर इमेजेस ऑन इन्स्टाग्राम: इफेक्ट ऑन वुमेन्स मूड अँड बॉडी इमेज,’ या शीर्षकाचा त्यांचा संशोधन लेख सायन्स डायरेक्ट जर्नलमध्ये प्रकाशित झाला. यात मांडलेल्या मुद्द्यांप्रमाणे, स्त्रिया आणि मुलींनी इन्स्टाग्रामवर वारंवार सुंदर, अट्रॅक्टीव्ह लोकांची छायाचित्रे पाहिल्याने सामाजिक तुलनेची भावना निर्माण होते. यामुळे आत्मविश्वास गमावून स्वतःच्या शरीराबाबत कमीपणा देखील वाटू शकतो. सुदैवाने, हळूहळू वारे दिशा बदलत आहे. अनेक देशांत सोशल मीडिया वापरकर्त्यांमध्ये फोटोत सुंदर दिसण्याऐवजी कुरूप बनविणारे फिल्टर ॲप्सची लोकप्रियता कमालीची वाढत आहे. असेच एक ॲप ‘रेमिनी’ सध्या चर्चेत आहे. कुरूपता स्वीकारण्याच्या दिशेने वाटचाल ॲप आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञाचा वापर करून क्ले फिल्टर स्टाइल प्रतिमा (इमेजेस) तयार करते. प्रतिमांमधील क्ले फिल्टर स्टाइल चेहरे काहीसे विचित्र, कुरुप पण गोंडस दिसतात. हे फिल्टर चेहर्यावरील वैशिष्ट्ये तशीच ठेवून प्रतिमा अधिक रंगीत आणि अतिशयोक्तीपूर्ण बनवते. वापरकर्त्यांना त्यांचा चेहरा व शरीर फोटोत मातीच्या शिल्पासारखे देखील प्रोजेक्ट करता येते. या ॲपची लोकप्रियता आहे तरी किती? वापरण्याकरिता मोफत असलेल्या, तसेच सर्वाधिक डाउनलोड झालेल्या ॲप्सच्या यादीत ‘रेमिनी’ ॲपने गेल्या तीन महिन्यांपासून टॉप ५ मध्ये स्थान मिळवले आहे. रेमिनी ॲपचा वापर सध्या जगभरात १०० दशलक्षपेक्षा अधिक लोक करतात. रेमिनीची पालक कंपनी मिलान, इटली येथील ‘बेंडिंग स्पून्स’ आहे. याचा सर्वात जास्त वापर चीनमध्ये होतो. शाहुंगशू हे चीनमधील इन्स्टाग्रामसारखे समाज माध्यम आहे. सध्या शाहुंगशूवर सर्वाधिक लाइक्स मिळतात ती अनेकांनी शेअर केलेल्या ‘रेमिनी’च्या माध्यमातून बनविलेल्या क्ले–शैलीतील प्रतिमांना. तोच तोच पणा झाला नकोसा एआय फिल्टर ॲप्सने एडिट केलेले थोडेसे कुरूप पण गोंडस फोटो पाहून समाज माध्यमांवर लोकांना आनंद का होतो? याचे उत्तर बीजिंगच्या सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ फायनान्स अँड इकॉनॉमिक्समधील मानसशास्त्राचे सहयोगी प्राध्यापक, डू डोंगुई यांनी दिले. अनेक वर्षे लोक ब्यूटीफिकेशन फिल्टर वापरून स्वतःला अधिक सुंदर भासविणार्या सेल्फी तसेच इतर छायाचित्र सोशल मीडियात पोस्ट करताहेत. हे सुरकुत्या नसणारे, एकसारखे गोरेपान चेहरे पाहून लोक कंटाळलेत. यात आता काही नावीन्य राहिले नाही. याउलट, क्ले फिल्टरचे रंग लोकांना साधेपणाकडे परत नेतात. थोडे ॲनिमेशन असल्याने बालपणाच्या आठवणी ताज्या होतात. एकंदरच, याचा मनावर देखील चांगला परिणाम होतो, असे डोंगुई म्हणतात. सौंदर्य हे पाहणार्याच्या डोळ्यात असते, ही म्हण सत्यच आहे. प्रत्येक व्यक्ती सुंदर दिसते आणि त्याच्या किंवा तिच्या चेहर्यावरील सुरकुत्या, फोड आणि पिंपल्स, देखील एकूण सौंदर्याचा भाग असतात. याला सांस्कृतिक दृष्टिकोन देखील आहे. स्टीफन बेली यांनी त्यांच्या ‘अग्ली: द एस्थेटिक्स ऑफ एव्हरीथिंग’ या पुस्तकात असे सुचवले आहे की, व्यक्तीतील थोडीशी कुरूपता ही सौंदर्यापेक्षा अधिक विविधता दर्शविणारी आणि आश्चर्यचकित करणारी ठरू शकते. त्यामुळे अशा किरकोळ दोषांबद्दल लोक काय म्हणतील याचा विचार करणे थांबवायला हवे. त्वचेवर कुठे डाग असतील तर त्यात काही कमीपणा वाटण्यासारखे नाही. साइज ‘झीरो फिगर’ व स्पॉटलेस ब्युटीचा नाद सोडून स्वतःचे खरे सौंदर्य स्वीकारायाला हवे. ‘रेमिनी’ सारख्या ॲप्सची वाढती लोकप्रियता ही कुरूपता स्वीकारण्याच्या दिशेने वाटचाल असल्यासारखे आहे.

# भाजप आपला उघड शत्रू.तर काँग्रेस त्याच्यापेक्षा मोठा छूपा शत्रू आहे!

भारतीय जनता पार्टी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अपत्य आहे आणि त्या अपत्याला वैदिक पद्धतीचे संस्कार देऊन वाढवणे हे आर एस एस चे कर्तव्यच ठरते.वैदिक पद्धत म्हणजे सामाजिक समतेला भारतीय समाजात रुजू न देता विषमतावादी विचारसरणीचे विष पेरणारी विचारधारा होय.ही आहे वैदिक पद्धत आणी हा संघर्ष भगवान बुद्धाच्या काळापासून सुरू असून सध्या पर्यंत तो संघर्ष चालत आलेला आहे व तो उघड आहे हे सत्य होय.परंतु ज्या काँग्रेसने हमेशा धर्मनिरपेक्षतेचा बुर्खा ओढून बौद्ध,मुस्लिम, आदिवासी तथा जे जे धर्मनिरपेक्ष लोक आहेत त्या सर्वांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा आपला कुटील इतिहास तर मागे टाकलाच आहे परंतु वर्तमानात सुद्धा त्याच इतिहासाच्या पाऊलखुणा शोधत पुढचाही राजकीय प्रवास पूर्ण करण्याचा त्यांचे धोरण दीसते.त्यामुळे इथे आज आपण काँग्रेसचा इतिहास जरा तपासून बघितला पाहिजे!

व मगच आपण वर्तमानातील परिस्थितीकडे आलेले बरे!

इथे आज आम्ही जेव्हा काँग्रेसच्या इतिहासात डोकवतो तेव्हा छल कपट,फितुरी, लालच तथा फोडाफोडी करून विरोधी प्रवाहातील लोकांना गळाला लावून घेणे व सत्तेपर्यंत पोहोचणे हे काँग्रेसच्या धोरणाचा मुख्य भाग आहे. व तेच धोरण भाजपचे पण आहे यात काही शंका नाही! मात्र बौद्धांचा कळवळा असलेल्या धर्मनिरपेक्ष काँग्रेसने काल लोकसभेच्या वेळी अशाच काळ्या बेऱ्या कारणाम्यातून समाजाला सतत भुल थापा देऊन फसवण्याचा उद्योग करून आपले गुपित साध्य केले जसे की २०२४ ला लोकसभेच्या वेळी संविधानाला धोका आहे सांगुन सविधान वाचवायचे आहे म्हणून मते मागितली खरे परंतु निवडून आल्या–आल्याच सर्वच धर्मांध व धर्मनिरपेक्ष म्हनवणाऱ्या काँग्रेस पक्षांने सुद्धा मिळून मिसळून संविधानातील आरक्षणच काढून घेऊन काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेने एससी एसटी व ओबीसी साठी किती घातक निर्णय घेतला आहे याचा प्रत्यय आम्हाला आणि आमच्यातील ज्यांनी त्यांना मतं दीले त्या विद्वानांना सुद्धा आनुन दिला त्यामुळे या विद्वान साहित्यिकांचा,लेखकांचा व दलाली करणाऱ्या पत्रकारांचा भ्रमनिरास झाला की नाही कुणास ठाऊक! कधीकाळी असाच खोळसाळपणा काँग्रेसने मजूर पक्षा विषयी केलेला आहे तो खालील प्रमाणे

ऐतिहासिक दृष्ट्या स्वतंत्र मजूर पक्षाविषयीची भयंकर खोट्या नाट्या प्रचार प्रसाराची अशीच एक घटना प्रस्तुत करण्याजोगी आहे.ती घटना म्हणजे १९३७ च्या निवडणूक निकालाची ही घटना होय! ही एवढी महत्त्वाची घटना आहे की शेवट त्या घटनेचे अध्ययन व विश्लेषण करण्याचा स्वतः डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी निर्णय घेतला. थोडक्यात सांगावयाचे झाले तर बाबासाहेब म्हणतात दरम्यानच्या काळात काँग्रेसने काय कोळसाळपणा केला याची मला जाणीव आहेच निवडणूक निकालांच्या आधारावर अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व करण्याच्या आपल्या दाव्याची काँग्रेसने भरपूर जाहिरात केली या जाहिरातीतील मुख्य मुद्दा असा होता की अनुसूचित जातींना दिल्या गेलेल्या एकूण १५१ जागांपैकी ज्याची बांधणी आणि उभारणी स्वतःज्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केली होती त्या स्वतंत्र मजूर पक्षाला फक्त बारा जागाच मिळाल्या आणि उर्वरित सर्व जागा काँग्रेस पक्षाने जिंकल्या

काँग्रेस अस्पृश्यांची प्रतिनिधित्व करते याचा निर्णायक पुरावा म्हणून ही उष्टावळ काँग्रेसच्या खानावळीतून वाढली गेली.या खोटारड्या प्रचाराचा परिणाम काही भागात खोलवर झाल्याचे जाणवले,एवढेच नव्हे तर श्री एच एन ब्रेल्सफोर्डसारख्या माणसाने आपल्या सब्जेक्ट इंडियाया पुस्तकात या काँग्रेस प्रणित खोडसाळ दाव्याचा उल्लेखही केला आहे काँग्रेसचा हा दवा खरा की खोटा हे जाणून घेण्याचा कोणताही प्रयत्न न करता लोक याला सत्य म्हणून स्वीकारू लागले. परंतु मला खात्री आहे की या पुस्तकातील निवडनुक निकालांचे विश्लेषण हे या भ्रामकप्रचाराच्या डोक्यावर ठोकलेला शेवटचा खिळा ठरेल.आणि पुढच्या माहितीत ते खरेच ठरले काँग्रेसचा सर्व दावा फोल ठरला आणि स्वतंत्र मजूर पक्ष हा अपयशाचे प्रतीक नसून पूर्णतः यशाचे प्रतीक आहे हे सिद्ध झाले असे फार मोठे विश्लेषण बाबासाहेबांनी त्यावेळी दिले आहे आणि तोच खोटारडेपणाचा कित्ता आजही काँग्रेस गिरवत आहे म्हणूनच आमचे म्हणणे असे आहे की बीजेपी सारख्या उघड शत्रू पासून आपण जेवढे सावध आहोत त्यापेक्षा काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेने पासून सावध होण्यासाठी डोळ्यात तेल घालून आष्टोप्रहर जागृत असलो पाहिजे! परंतु अतिशय दुःखाची गोष्ट अशी की,आमची काही बौध्द मंडळीच कोणी काँग्रेसच्या दारात तर कोणी शिवबंधनात अडकतात आणि कोणी नागपूर सारख्या पवित्र भूमितील लोक भाजपच्या गळ्यात गळा टाकून आहेत तेवढेच काय? आजकाल राष्ट्रवादी सारख्या घराणेशाहीत डुबलेल्या पक्षाच्या दारात जाऊन लज्ञास्पद शरणागती पत्करत आहेत वरून मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आमच्यावर फार मोठे उपकार आहेत आमच्या कातडीचा जोडा जरी शीवतो म्हटले तरी त्यांचे उपकार आमच्याच्याने फिटणार नाहीत असा वरून तुकोबाचा छाप पण समाजावर ठेवतात.तेव्हा बांधवांनो कृपा करून त्या फसव्या पक्षांच्या व खोटारड्या नेत्यांच्या गळाला लागून अशी समाजाला लाजवणारी शरणांगती पत्करू नका!या काँग्रेसने केलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या व अस्पृशांच्या छळा विषयीचे ग्रंथचे ग्रंथ भरून पडलेले आहेत म्हणून आम्ही परत शेवटी सांगतो की,भाजप आपला उघड शत्रू आहे परंतु त्याहीपेक्षा घातक काँग्रेस हा मोठा छुपा शत्रू आहे.आणि तीच ओळख राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेची पण आहे! हे लक्षात घ्या!

जय भीम जय भारत

**********

जीवन बोदडे
९६८९२६८६२०,
भांबेरी,तालुका तेल्हारा,जिल्हा अकोला.

# महाराष्ट्र वाचवा.अब की बार–महाराष्ट्रातून भ्रष्टाचारी भाजपा तडीपार.

१ २६–१०–२०२४ रोजी खारघर पोलिस स्टेशन येथे सायंकाळी ५ वाजता, देशाच्या वित्तमंत्री यांच्यावर (फर्स्ट इनफार्मेशन रिपोर्ट) चा प्रयत्न झाला. उपस्थित पोलिसांनी कायद्याने सहकार्य केले व आमचे अंदाजे ३०० पानाची कंप्लेंट रजिस्टर करण्या बाबत स्वीकारले.पोच पावती,सही शिक्या सहित आम्हाला सुपूर्द करण्यात आली. पुढील कारवाई कशी व केव्हा सूरु होयील या वर अंदाज बांधत आहेत. रजिस्टर झाला नाही तर कोर्टात पुढील कारवाई करण्यात येईल असे आयोजकानी जाहिर केले. २. ऐन निवडणुकीच्या काळात हा वादग्रस्त व ज्वलनशील निर्णय कसा काय घेतला अशी विचारणा केल्या नंतर कळाले की येत्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत इलेक्टोरल बाँड म्हणजे एक्सटॉर्शन बाँडचा पैसाचा व भाजपचे काळा पैसा वापर होणार ही भीती व्यक्त करण्यात आली. इलेक्टोरल बाँड म्हणजे एक्सटॉर्शन बाँड च्या माध्यमाने जवळपास रुपये ६५६८ कोटी रक्कम भाजपला प्राप्त झाली आहे व ह्या रकमेचा दुरुपयोग महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत रोकन्या करीता असा पुढाकार घेण्यात आला आहे. (फर्स्ट इनफार्मेशन रिपोर्ट) सोबत सुप्रीम कोर्ट चे निर्णय दिनांक १५–०२–२०२४ व ११–०३–२०२४ जोडण्यात आले आहे. व अन्य कागदोपत्री पुरावे पण जोडण्यात आले. ३. इलेक्टोरल बाँड यात अनेक मुद्दे आहेत.सुप्रीम कोर्ट निर्णयात या इलेक्टोरल बाँड स्कीम ला असावैंधानिक घोषित करण्यात आले पण सखोल न्यायलीन चौकशीचे आदेश देण्यात आले नाही.भाजप सरकारने सुद्धा सुप्रीम कोर्ट निगराणीत (स्पेशल इन्वेस्टीगेशन टीम) ची घोषणा करण्यात आली नाही. गझउ ाशरप तर्फे सुध्दा चौकशीचे आदेश देण्यात आले नाही. भाजपने सरकारी संस्थाचा दुरुपयोग केला, फिरोती वसुल केली, चंदा दो– धंदा लो, असे अनेक आरोपांचा शेवट होण्या करिता ऋखठ चा प्रयत्न आहे. सामान्य जनता प्रश्न विचारू शकत नाही,ड्इख ने इलेक्टोरल बाँड कशे काय छापले, सीरियल नंबर दिसत नवाहता,कोणत्या राजकीय पार्टीला पैसे मिळालेत किती मिळालेत,शेल कंपनीचा वापर,काळा पैसा किती वापरला,अकाऊंटिंग एंट्रीज का नाहीत,अनेक कायदे या इलेक्टोरल बाँड स्कीम करिता का बदललेत. ४. ६. भाजपाचे एश्रशलींरश्र इेपव चे धन व भाजपाच्या काळा धना पासून महाराष्ट्र विधानसभा निवडणूक वाचवा–महाराष्ट्र वाचवा. अब की बार–महाराष्ट्रातून भ्रष्टाचारी भाजपा तडीपार.भाजपा महाराष्ट्र निवडणुकीत प्रचंड काळा पैसाचा उपयोग करण्या पासून रोखण्या करिता निवृत्त–उच्चशिक्षित–साविंधान प्रेमी जनता भाजपचा भ्रष्टाचार – पोलखोल मोहीम कृती कार्यक्रम सुरवात करीत आहे. ७. ८. संयोजक १) अरविंद सोनटक्के– ९९८७९३६३०८.( अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश भारतीय राष्ट्रीय काँग्रेस निवृत्त अधिकारी आणि कर्मचारी विभाग ) २) राजू रोटे – ९१ ८४५४० ७८०७३, ३) कलावत साहेब ( उपाध्यक्ष काँग्रेस) ४) किशोर साळवे–+९१ ९३२३३ ०४१७५, ५) देशमुख सर +९१ ७५०६८ ५२७५१, ६) एड. किशोर कांबळे सर ९९६९२२१८७४, ७) डॉ.अविनाश वॉलिंजकर ९९२०३ ८६४२९,८) अरविंद बोरकर ाळी ९१ ९८६७१ ०४७८५, ९) देशपांडे सर ९९६९२ ५८७४२, १०) उल्हास चौधरी –+९१ ९९६९९ ४६५१६,११ ) विक्रांत वॉलकर–९००४५ ४११८४, १२) ललिता सोनवणेताई,१३) मोनाली कांबळे ताई, १४) डॉक्टर प्रतिभा पवार मॅडम,१६) मधुरा दिवटे ताई–+९१ ९५९४१ ८७६४७. ९. सोबत ऋखठ ची प्रत व अन्य पुरावे जोडलेले आहे.

**********

संयोजक
अरविंद सोनटक्के– ९९८७९३६३०८.खारघर नवी मुंबई.
(अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश भारतीय राष्ट्रीय काँग्रेस निवृत्त अधिकारी आणि कर्मचारी विभाग)

# महागाईचे आव्हान!

वाढत्या अन्नधान्य, भाजीपाला, तेलाच्या किमतींमुळे सामान्यांचे बजेट कोलमडले आहे. राजकीय पक्ष आणि नेते निवडणुकीच्या राजकारणात मशगुल असल्याने त्यांचे याकडे लक्षही नाहीये. भारतात किरकोळ आणि घाऊक अशा दोन स्वरुपात महागाईचे म्हणजेच चलनवाढीचे मोजमाप केले जाते. किरकोळ महागाईचा दर सामान्य ग्राहकांनी भरलेल्या किमतींवर आधारित असतो. त्याला ‘ग्राहक किंमत निर्देशांक’ असेही म्हणतात. घाऊक किंमत निर्देशांक म्हणजे घाऊक बाजारातील एका व्यापार्याने दुसर्या व्यापार्याकडून आकारलेल्या किमतीवर आधारित असतो. घाऊक महागाईत उत्पादित उत्पादनांचा वाटा सुमारे ६४ टक्के असतो; तर प्राथमिक वस्तूंचा २३ टक्के आणि इंधन आणि ऊर्जा यांचा वाटा १३ टक्के असतो. किरकोळ महागाईमध्ये अन्न आणि उत्पादनांचा वाटा ४६ टक्के असतो. नुकत्याच झालेल्या चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीत आरबीआयने या आर्थिक वर्षासाठी आपला महागाईचा अंदाज ४.५ टक्के ठेवला होता.

आरबीआयचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी महागाई कमी होत आहे, असे म्हटले होते. पण महागलेल्या भाज्यांमुळे सप्टेंबर महिन्यात किरकोळ महागाई ५.४९ टक्क्यांवर पोहोचली असून ही ९ महिन्यांतील सर्वोच्च पातळी आहे. ऑगस्टमध्ये किरकोळ महागाईचा दर ३.६५ टक्के होता. सप्टेंबर महिन्यात घाऊक महागाई ही १.८४ टक्क्यांवर पोहोचली आहे. यापूर्वी ऑगस्टमध्ये घाऊक महागाई दर १.३१ टक्के होता. आज चार जणांच्या एका कुटुंबाला रोजच्या भाजीपाल्यासाठी जवळपास १०० रुपये म्हणजे महिन्याकाठी ३ हजार रुपये खर्च करावे लागत आहेत. दीड–दोन वर्षांपूर्वी शंभर रुपयांखाली असणार्या डाळी १८० ते २०० रुपये किलोवर पोहोचल्या आहेत. महिन्याला चार किलो डाळी वापरणार्या कुटुंबाला यासाठी ७०० ते १००० रुपये खर्च करावा लागत आहे. खाद्यतेलाचे भाव पाहिल्यास तेही १२० ते २०० रुपयांवर पोहोचले आहेत. गॅस सिलिंडरचा दर साधारणतः हजारच्या वरखाली आहे. विजेचे दर वाढवल्यानंतर मध्यमवर्गीय कुटुंबाची महिन्याची लाइट बिले १००० रुपयांपेक्षा वर गेल्याचे दिसून आले आहे. म्हणजेच ७ ते ८ हजार रुपये केवळ या चार–पाच गोष्टींवर खर्च होताहेत. याखेरीज दुधासाठी २ हजारांपेक्षा जास्त रुपये, पेट्रोल १०० रुपयांपेक्षा अधिक प्रतिलिटर अशी भली मोठी यादी सामान्यांचा खिसा रिकामा करत आहे. परिणामी, आतापर्यंत किलोने विकल्या जाणार्या भाज्या आता पाव किलोने खरेदी कराव्या लागत आहेत. नागरिक भाजीपाला खरेदीसाठी पिशवी सोबत घेऊन जातात खरे, परंतु परतताना ती पिशवी रिकामीच असते. मध्यंतरी तांदळाचे भाव वाढल्याने सरकारने तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली. परिणामी काही अंशी तांदळाच्या किमतीवर नियंत्रण आले. मात्र अन्य वस्तूंचे भाव मात्र वाढलेलेच आहेत. आतापर्यंत पावसाळी वातावरणामुळे डाळ, राजमा, वाटाणे यासारख्या वस्तूंचे भाव वधारलेले दिसत होते. आता किरकोळ बाजारात टोमॅटो १०० रुपये किलो, हिरवी मिरची १५० रुपये किलो, कांदे–बटाटे ५०–६० रुपये किलो दराने विकले जात आहेत. भेंडी, वांगे तर ८० रुपये किलोपर्यंत पोचले आहेत. ४०० रुपये किलोवर गेलेला लसूण आजही तेथेच आहे. अशा स्थितीत सामान्यांनी जगायचे कसे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. महागाईचा थेट संबंध क्रयशक्तीशी असतो. उदाहरणार्थ, जर महागाई दर ५ टक्के असेल, तर कमावलेले १०० रुपये ङ्गक्त ९५ रुपये असतील. महागाईची वाढ आणि घसरण उत्पादनाची मागणी आणि पुरवठा यावर अवलंबून असते. जर लोकांकडे जास्त पैसे असतील तर ते अधिक वस्तू विकत घेतील. जास्त वस्तू घेतल्यास वस्तूंची मागणी वाढेल आणि मागणीनुसार पुरवठा झाला नाही, तर या वस्तूंच्या किमती वाढतात. अशा प्रकारे बाजार महागाईला बळी पडतो. सोप्या भाषेत सांगायचे तर, पैशाचा अतिप्रवाह किंवा बाजारात वस्तूंची कमतरता यामुळे महागाई वाढते. तर मागणी कमी आणि पुरवठा जास्त असेल तर महागाई कमी होते. संयुक्त राष्ट्र संघाच्या व्यापार आणि विकास संघटना (यूएनसीटीडी)च्या मते, खाद्य तेलाच्या किमतीत दहा टक्के वाढ झाल्याने गरीब कुटुंबाच्या उत्पन्नात पाच टक्के घसरण झाल्याचे म्हटले आहे. वास्तविक ही रक्कम एका कुटुंबाच्या आरोग्यापोटी होणारा खर्च भागविण्याचे काम करते. ‘यूएनसीटीडी’च्या अंदाजानुसार जगभरात समोर आली आहे. उत्तर भारतातील बहुतांश राज्यांमध्ये सरासरी उत्पन्न देशाच्या तुलनेत कमी असताना तेथे महागाईचा दर सर्वाधिक नोंदवला गेला. गेल्या तीन दशकांत भारताचे चित्र बदलले आहे. अर्थव्यवस्थेच्या मूळ निकषात बराच बदल झाला आहे. सेवा क्षेत्राचा वाटा हा सकल विकासाच्या उत्पादनात वाढत आहे. औद्योगिक आणि उत्पादन क्षेत्राचा वाटा देखील वाढत आहे. पण खाद्यपदार्थांचे भाव वाढण्याबरोबरच वस्तूनिर्मितीचा खर्चही वाढला आहे. वाहनांचे उत्पादन, यंत्रसामग्री निर्मिती आणि उपकरणांची निर्मिती यांचा खर्च वाढला आहे. पोलादापासून सीमेंट आणि अन्य धातूंसह



महागाई आणि वाढते कर्ज ही एक गंभीर समस्या बनली आहे. त्याचबरोबर खाद्य पदार्थ आणि विजेच्या वाढत्या दरामुळेही कोट्यवधी लोकांचे दिनमान अडचणीत सापडले आहे. एकंदरीत अर्थव्यवस्थेची बिघडलेली घडी अजूनही विस्कटलेलीच आहे. यातच आता रशिया–युक्रेन आणि इस्राइल–हमासचे युद्ध, इस्रायल–इराणचे युद्ध, हवामान बदलामुळे निर्माण होणारे संकट यामुळे जगाची स्थिती आणखीच ढासळली आहे. जारी होणारा फूड प्राइस इंडेक्स हा विक्रमी पातळीवर पोचला आहे आणि तो मागच्या वर्षाच्या तुलनेत सध्या २०.८ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. वाढत्या महागाईचा संबंध खाद्य उत्पादन आणि वीज दर भडकण्याशी असून त्याचा परिणाम लोकांच्या प्रत्यक्ष उत्पन्नावर पडणार आहे. त्यांच्या राहणीमानाची गुणवत्ता ढासळण्याची आणि आगामी काळातील संभाव्य संधी बाधित होण्याची शक्यता आहे. वाढत्या गरिबीमुळे असमानतेची दरी आणखी वाढू शकते. परिणामी शिक्षणाचा स्तर आणि उत्पादनात घसरण दिसू शकते.

आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या राज्यांना अधिक महागाईची झळ बसत आहे. या राज्यांमध्ये अन्नधान्याचे चांगले उत्पादन होऊनही अन्नधान्य महागाई येथे मोठी समस्या बनली आहे. कमी उत्पन्न आणि वाढती महागाई असा दुहेरी मारा सहन करणार्या उत्तर भारतातील राज्यांतून चिंताजनक आकडेवारी औषध क्षेत्र, देशार्तंगत निर्मिती होणारे वीज उपकरणे हीदेखील महागली आहेत. या सर्व उत्पदनाच्या किमती वाढल्याचा थेट परिणाम ग्राहकांच्या क्रयशक्तीवर होणार आहे. भारत विकासाच्या मार्गावर आहे आणि विकसित देश बनण्यासाठी प्रयत्न करत आहे. अशा काळात आपल्याला महागाईला चाप बसविण्यासाठी अर्थव्यवस्थेच्या मूलभूत निकषांकडे पाहावे लागेल. कारण किरकोळ किमती भडकल्या, तर मोठ्या प्रमाणात जनतेमध्ये असंतोष निर्माण होऊ शकतो. यामुळे किरकोळ महागाई आटोक्यात आणण्यासाठी तात्काळ पावले उचलली गेली पाहिजेत. रिझर्व्ह बँकेने व्याजदर ठरवताना अन्नधान्य चलनवाढीचा विचार करू नये, अशी शिङ्गारस मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी इकॉनॉमिक सर्व्हेमध्ये केली आहे. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरणाचा अन्नधान्याच्या किमतीशी काहीही संबंध नाही. मागणी व पुरवठा यांच्यावर अन्नधान्याच्या किमती अवलंबून असतात, असे कारण देऊन नागेश्वरन यांनी ही शिफारस केली आहे. परंतु रघुराम राजन यांच्यासारख्या जाणकार अर्थतज्ज्ञांनी यास असहमती दर्शवली आहे. यामुळे लोकांचा मध्यवर्ती बँकेवरील विश्वास कमी होईल, असा इशारा त्यांनी दिला. त्यामुळे महागाईच्या मुद्द्याकडे सरकारने संवेदनशीलपणाने पाहणे गरजेचे आहे.

# केज विधानसभेचा सौ.सीताताई बनसोड यांची उमेदवारी दाखल

## हारुणभाई इनामदार व उमेदवार सौ.सीताताई बनसोड शेकडो कार्यकर्त्यांसह मनोज दादा जरांगे पाटील यांच्या भेटीला रवाना


केज/प्रतिनिधी :- केज विधानसभेचा सौ.सीताताई बनसोड यांची उमेदवारी दाखल केली आहे. त्याचबरोबर उमेदवारी दाखल केल्यानंतर हारुणभाई इनामदार व उमेदवार सौ.सीताताई बनसोड हे शेकडो कार्यकर्त्यांसह अंतरवाली सराटी येथे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी रवाना झाले आहेत. यावेळी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना हारुणभाई इनामदार म्हणाले की,आरक्षण युद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या लढ्या सोबतच मुस्लिम समाजाला देखील आरक्षण मिळावे यासाठी ते प्रयत्नशील आहेत व प्रयत्न करत आहेत. त्याचबरोबर दलित समाजासाठी देखील जरांगे पाटलांची भूमिका महत्त्वाची आहे. केज विधानसभा मतदारसंघ हा गेला ६२ वर्षापासून अनुसूचित जातीय प्रवर्गाला राखीव आहे. परंतु या मतदारसंघामध्ये अद्यापही दलित समाजाचा उमेदवार हा आमदार झालेला नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांची विचारधारा घेऊन आरक्षण योद्धा जरांगे पाटील हे गोरगरिबासाठी लढत आहेत त्यांची भूमिका रास्त



असल्यामुळे आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत व त्यांचे हात बळकट करण्यासाठी सौ.सीताताई बनसोड या बौद्ध समाजाच्या उमेदवार आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी सीताताई बनसोड यांना उमेदवारी दिली तर त्यांच्या पाठीमागे मनोज दादाच्या माध्यमातून मराठा समाज व बौद्ध, बहुजन समाज आणि मुस्लिम समाजासह इतर समाज मोठ्या ताकदीनिशी एकवटलेला आहे. सीताताई बनसोड या केज विधानसभा मतदारसंघाचा विकास करण्यासाठी सक्षम उमेदवार आहेत पुढे बोलताना इनामदार म्हणाले की, मनोज दादा जो आदेश देतील व जी भूमिका घेतील ती भूमिका आम्हाला मान्य राहील. यापुढे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या खदयाला खांदा लावून आम्ही सामाजिक चळवळीत काम करू असे बोलताना त्यांनी स्पष्ट केले आहे. आमच्या प्रतिनिधी उमेदवार सौ. सीताताई बनसोडे यांना विचारलेला प्रश्न उत्तर देताना म्हणाल्या की, मी गेले अनेक वर्षांपासून सामाजिक , राजकीय आणि विविध कमिटीवर सदस्य म्हणून पदभूषवून दिनलित शोषित, बहुजनांचे प्रश्न सोडवले आहेत.जे नागरिक अडचणीत सापडले त्यांनी वेळोवेळी मला मदतीसाठी आवाज दिला त्या नागरिकांच्या हाकेला मी धावून जाऊन प्रत्येकांचे प्रश्न तत्पर्तने सोडविले आहेत त्याचबरोबर मागील २५ ते ३० वर्षापासू सतत सामाजिक व राजकीय चळवळीमध्ये आजपर्यंत काम करत आलेले आहे. त्याच आधारे आरक्षण योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्यासाठी मी दादांना उमेदवारी मागत आहेत नक्कीच दादा माझ्या उमेदवारीचा विचार करून उमेदवारी देतील अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## जर तुम्ही दररोज २ किलोमीटर वेगाने चालल्यास शरीरावर काय परिणाम होतो? तज्ज्ञांकडून जाणून घ्या

वेगाने चालणे हा व्यायामाचा एक सहज करता येण्यासारखा प्रकार आहे. वेगाने चालण्याचे अनेक फायदे आहेत. तुमच्या दैनंदिन दिनचर्येमध्ये दोन किलोमीटर वेगाने चालणे समाविष्ट केल्यास तुमचे आरोग्य लक्षणीयरीत्या सुधारू शकते. परंतु, योग्य तंत्र आणि संभाव्य धोक्यांची जाणीव महत्त्वाची आहे. दिल्लीच्या सी. के. बिर्ला हॉस्पिटलमधील एचओडी-फिजिओथेरपी विभागाचे डॉ. सुरेंद्र पाल सिंग यांनी दी इंडियन एक्स्प्रेसला सांगितले, नियमित वेगात चालणे हे सर्वांगीण आरोग्याला चालना देण्यासाठी एक प्रभावी साधन आहे. आपण दररोज अशी कृती केल्यास त्याचा आपल्या शरीरावर कसा परिणाम होतो ते जाणून घेऊ. हृदय व श्वासोच्छ्वासाला चालना : वेगाने चालण्यामुळे तुमचे हृदय आणि फुफ्फुसे मजबूत होतात. त्यांची कार्यक्षमता सुधारणे आणि तुमच्या कार्य करण्याची क्षमता वाढवण्याला त्यामुळे चालना मिळते. रक्तदाब नियमन : या व्यायाम प्रकारामुळे रक्तदाबावर नियंत्रण राहते आणि हृदयरोगाचा धोका कमी होतो. सांध्यांची लवचिकता सुधारते : वेगात चालण्याने तुमच्या सांध्यांची लवचिकता सुधारून, कडकपणा कमी होतो. मधुमेह व्यवस्थापन : वेगात चालण्याच्या कृतीने रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत मिळते. मधुमेहींसाठी ही बाब स्वाभाविकत: फायदेशीर ठरते. वजन व्यवस्थापन चमत्कार : कॅलरी बर्न करणे, वजन कमी करणे किंवा निरोगी वजन व्यवस्थापन यांसाठी वेगात चालण्यामुळे योगदान मिळेल.



# माजलगाव विधानसभेसाठी प्रा.ईश्वर मुंडे यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल खा.शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत बंडखोरी

माजलगाव /प्रतिनिधी :- देशाचे नेते पद्म विभुषण खा.शरदचंद्र पवार साहेब व प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकारी पदावरून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेऊन राष्ट्रवादी कॅांग्रेस शरदचंद्र पवार पक्षात धारूर तालुकाक्षध्य,ओबीसी सेल प्रदेश सरचिटणीस,सेवा निवृत्त अधिकारी सेल राज्य प्रमुख या पदावर पक्षाचे सक्रीय काम करून खा.शरदचंद्र पवार साहेबांचे व पक्षाचे विचार वाडी,वस्ती, तांड्यापर्यंत पोहचवले. सन.२०१९ ला माजलगाव मतदार संघाचा आमदार निवडून आनला.पक्ष फुटल्यानंतर ही निष्ठेने खा.शरदचंद्र पवार साहेबांच्या पक्षातच राहीलेले ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करून जन सामान्यांच्या मनात घर केलेले प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे हे खा.शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॅांग्रेस कडून माजलगाव विधानसभा लढण्यास ईच्छूक होते.

मागे सन २०२१ ला छत्रपती संभाजी नगर पदवीधर मतदार संघात उमेदवारी मागणी केलेली होती,२०२४ ला बीड लोकसभा मतदार संघात जनसंपर्क वाढवून बीड लोकसभेच्या उमेदवारीची मागणी केलेली होती.वरील दोन्ही वेळी मला पक्षाने आपला नंतर विचार करू असे सांगून थांबवले.



आता सन २०२४ च्या माजलगाव विधानसभा निवडणूकीसाठी पक्षाकडे रितसर उमेदवारीची मागणी करून माजलगाव मतदार संघातील शंभर गावात जन संवाद दौरा करून पक्षाचे कार्य वाढवलेले आहे.माझ्या परिचय पत्राच्या पन्नास हजार प्रति मतदार संघातील सर्व गावांमध्ये वाटप केलेल्या आहेत.

या वेळी माजलगाव मतदार संघात माझ्या विषयी मतदारांमध्ये सहानुभूती असून पक्षाने आपणास संधी द्यावी अशी जन भावना होती. या मुळे मी निश्चित निवडणूक जिंकू शकत होतो.परंतू असे न होता मला पक्षाने निवडणूक लढण्याची संधी व तिकीट दिले नाही.

या मुळे मतदार संघातील जनता नाराज झालेली असून तुम्ही अपक्ष निवडणूक लढवावी आम्ही तुमच्या पाठीशी आहेत हा दबाव माझ्यावर वाढत असल्यामुळे मी माजलगाव विधानसभा मतदार संघ निवडणूक - २०२४ जनतेच्या विश्वासावर अपक्ष लढवून जिंकणार आहे असे सांगून प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी आज सोमवार दि.२८ क्टोबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता आपला उमेदवारी अर्ज कोणताही गाजा वाजा न करता आई वडील दर्शन,गांजपूर येथील ग्राम दैवतांचे दर्शन घेऊन किल्ले धारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,लोकनेते गोरीनाथराव मुंडे साहेब यांच्या चौकात अभिवादन करून साध्या पध्दतीने निवडणूक निर्णय अधिकारी माजलगाव यांचे कडे दाखल केला आहे.

# एकनिष्ठ शंकर देशमुख यांची बीड जिल्हा अध्यक्ष पदी वर्णी

केज/तात्या गवळी आज राजकारण म्हटले की निष्ठावंत असण्याची कमतरता भासते एकीकडे सर्वच पक्षात निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलले जातं असताना भाजपने मात्र दोन पिढ्यापासून पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी एकनिष्ठ असलेल्या देशमुख कुटुंबाला न्याय दिला आहे. भाजपचे सरचिटणीस शंकर देशमुख यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी अचानक राजीनामा देऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला होता. त्यानंतर या पदावर कोणाची वर्णी लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. दरम्यान शनिवारी दुपारी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शंकर देशमुख यांना त्यांच्या नव्या जबाबदारीचे पत्र दिले. शंकर देशमुख हे भाजपचे विद्यमान सरचिटणीस आहेत. माजीमंत्री पंकजा मुंडे, प्रीतम मुंडे यांचे निकटवर्तीय म्हणून देशमुख यांची ओळख आहे. वडिलांपासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपचा वारसा असणाऱ्या देशमुख कुटुंबातील शंकर देशमुख हे कारसेवक म्हणून बाबरीमस्जिद पतनाच्या वेळी आंदोलनात सक्रिय सहभागी होते. घरात भाजपचा वारसा असल्याने पक्षनिष्ठ म्हणून त्यांनी अनेक वेळा वेगवेगळ्या पदावर जबाबदारी पार पाडली आहे. बूथ पासून ते लोकसभेपर्यंत प्रत्येक निवडणुकी त पक्षाचं काम हिरीरीने करणारे म्हणून शंकर देशमुख यांची पक्षाच्या वरिष्ठ पातळीवर ओळख आहे.



# प्रचंड शक्तीप्रदर्शनाने महायुतीचे उमेदवार ना. संजय बनसोडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## आजच्या महारॅलीतून क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब : माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांचा विश्वास

उदगीर/बाबासाहेब मादळे :- हजारोंचा जनसमुदाय सहभागी असलेल्या भव्यदिव्य रॅली द्वारे, शहरातील नागरिकांना अभिवादन करीत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री ना. संजय बनसोडे यांनी महायुतीकडून प्रचंड शक्तीप्रदर्शनाने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. आज उदगीर शहरात पार पडलेली महारॅली ना. संजय बनसोडे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी अशीच होती असा विश्वास ना. बनसोडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आलेल्या माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केला. उदगीर विधानसभा मतदारसंघातुन महायुतीचे उमेदवार राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री ना. संजय बनसोडे यांनी आज सोमवारी माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी ना.संजय बनसोडे यांच्या पत्नी सौ. शिल्पा बनसोडे, माजी आ. गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अफसर शेख, मकरंद सावे, प्रशांत पाटील, खरेदी विक्री संघाचे चेअरमन भरत चामले, वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापुरे, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, भाजपाचे तालुकाध्यक्ष शिवशंकर धुप्पे, शहराध्यक्ष मनोज पुदाले, सुधीर भोसले, शिवसेनेचे नेते ॲड. गुलाब पटवारी, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानी,अमोल निडवदे, डॉ. कल्पना किणीकर,महानंदा सोनटक्के, दीपाली औटे, अनिता हैबतपुरे, प्रीती पाटील यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस,भाजप, शिवसेना व रिपाईसह घटक पक्षाचे नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते. राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे हे महायुतीकडून विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याने सकाळ पासूनच नागरिकांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात गर्दी करण्यासाठी सुरुवात केली होती. रॅलीला सुरुवात होण्यापूर्वी ना. बनसोडे यांनी उदागिर बाबांच्या किल्ल्यात जाऊन दर्शन घेतले. त्यांनतर हजरत सय्यद ख्वाजा बादशाह रहेमतुल्ला आलय दर्गा येथे चादर चढवून प्रार्थना केली. यानंतर श्री गुरु हावगीस्वामी महाराज मठ, श्री शंकरलिंग महाराज मठ संस्थान, विश्वशांती बुद्ध विहार, आदी ठिकाणी जाऊन दर्शन घेतले. महारॅली मुख्य रस्त्यावरुन सकाळी १० वाजता निघाली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा बसवेश्वर, छत्रपती शाहु महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला ना. बनसोडे यांनी अभिवादन केले. काल उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सकाळपासून मतदार संघातील नागरिकांची लगबग सुरू झाली. टप्याटप्याने महिला - पुरुष व तरुणांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात जमा होऊ लागले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून भव्यदिव्य रॅलीला सुरुवात झाली. रॅली जसजशी पुढे सरकू लागली तशी तशी रॅलीमध्ये प्रचंड गर्दी वाढत होती. रॅलीची सुरुवात झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकापर्यंत नागरिकांची तुफान गर्दी होती. तब्बल पाच ते सहा तास शहरात रेकॉर्ड ब्रेक नागरिकांची गर्दी होती. यावेळी विविध वेशभूषेतील महिला व पारंपारिक वाद्याने रॅलीची शोभा वाढवली. छत्रपती शिवाजी महाराज चौकात ना.संजय बनसोडे यांच्यासह महायुतीच्या प्रमुख नेत्यांनी उपस्थितांना संबोधित केले.

# रवा की गव्हाचे पीठ; आरोग्यासाठी जास्त फायदेशीर काय? जाणून घ्या, तज्ज्ञ काय सांगतात

भारतीय लोक स्वयंपाकघरांमध्ये अनेक पदार्थ बनवण्यासाठी सर्वात जास्त रवा आणि गव्हाच्या पीठाचा वापर करतात. रवा आरोग्यासाठी जास्त फायदेशीर आहे का की गव्हाचे पीठ, असा प्रश्न अनेकदा विचारला जातो. याविषयी द इंडियन एक्स्प्रेसनी इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल येथील इंटरनल मेडिसिनचे वरिष्ठ सल्लागार डॉ. राकेश गुप्ता यांच्या हवाल्याने सविस्तर माहिती जाणून घेतली आणि रवा आणि गव्हाच्या पिठाचे फायदे आणि तोटे समजून घेतले.

रवा रवा हा डुरम गव्हापासून बनवला जातो, ज्याला मॅकरोनी गहूसुद्धा म्हणतात. उपमा, इडली किंवा शिरा यांसारखे पदार्थ बनवण्यासाठी रव्याचा वापर केला जातो. पास्ता बनवण्यासाठीसुद्धा रवा वापरला जातो. १०० ग्रॅम रव्यामध्ये ३५०-३६० कॅलरीज असतात, ७२ ग्रॅम कर्बोदके असतात. १२ ग्रॅम प्रोटिन्स आणि एक ग्रॅम फॅट्स असतात. त्यात मध्यम प्रमाणात फायबर (३ ग्रॅम) आणि आवश्यक असे खनिजे असतात; जसे की लोह, मॅग्नेशियम, थायामिन, नियासिन तसेच रव्यामध्ये व्हिटॅमिन बीसुद्धा असते.



रव्यामध्ये कर्बोदकाचे प्रमाण जास्त असल्याने हा ऊर्जेचा एक चांगला स्त्रोत मानला जातो, त्यामुळे व्यायामापूर्वी नाश्त्यामध्ये रव्यापासून बनवलेले पदार्थ खाणे आरोग्यासाठी चांगले आहे. रव्यामध्ये मध्यम ग्लायसेमिक इंडेक्स आहे, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते. रव्यामधून मध्यम प्रमाणात प्रोटिन्स मिळतात, जे स्नायूंच्या आरोग्यासाठी आणि वाढीसाठी फायदेशीर आहे. रवा हा पचायला हलका मानला जातो, ज्यामुळे पचनाशी संबंधित समस्या असलेल्या लोकांना रव्यापासून तयार केलेले पदार्थ खाण्याचा सल्ला दिला जातो.

गव्हाचे पीठ गव्हाचे पीठ आपण सहसा पोळी, रोटी, पराठा, पुरी बनवण्यासाठी वापरतो. १०० ग्रॅम गव्हाच्या पीठामध्ये ३४० ते ३५० ग्रॅम कॅलरीज दिसून येतात. यामध्ये ७१ ग्रॅम कर्बोदके, १२-१३ ग्रॅम प्रोटिन्स आणि दोन ग्रॅम फॅट असते. विशेष म्हणजे गव्हाच्या पिठामध्ये रव्यापेक्षा जास्त फायबर असतात. १०० ग्रॅम गव्हाच्या पिठामध्ये १२ - १३ ग्रॅम फायबर असतात. गव्हामध्ये लोह, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन बी असते. आरोग्यासाठी रवा फायदेशीर आहे की गव्हाचे पीठ?

गव्हाच्या पिठामध्ये रव्यापेक्षा जास्त फायबर असतात, ज्यामुळे भूक कमी लागते आणि वजन नियंत्रित ठेवण्यास मदत होते; तसेच रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित राहते. रवा आणि गव्हाच्या पिठामध्ये मध्यम ग्लायसेमिक इंडेक्स असतो, तरी गव्हामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असल्याने रक्तातील साखरेचे उत्सर्जन कमी होते, जे मधुमेहाच्या लोकांसाठी अधिक फायदेशीर आहे.

पचनक्षमतेचा विचार केला तर रवा हा गव्हाच्या पिठापेक्षा पचायला हलका आहे. जे लोक आजारातून नुकतेच बरे झाले आहेत किंवा ज्यांना पचनाशी संबंधित समस्या असेल त्यांनी रव्याचे सेवन करावे. दीर्घकाळ भूक कमी करण्यासाठी रवा गव्हाच्या पिठाइतका प्रभावी नाही.

गव्हाचे पीठ हा पौष्टिक आहारासाठी एक चांगला पर्याय आहे, पण रवा हा सहज पचण्यायोग्य आहे. रवा आणि गव्हाचे पीठ हे दोन्ही संतुलित आहाराचा भाग आहे. विशेष म्हणजे याचे योग्य प्रमाणात सेवन करणे तसेच इतर धान्ये, प्रोटिनयुक्त पदार्थ आणि भाज्या यांचा आहारात समावेश करणे निरोगी आरोग्यासाठी फायदेशीर ठरते.

# खरंच कोथिंबिरीचा रस प्यायल्याने वजन कमी होते? जाणून घ्या, हा रस आरोग्यासाठी कसा फायदेशीर?

भारतीय स्वयंपाकघरात प्रामुख्याने मसाले वापरले जातात. विशेषत: कोथिंबीर आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे. आहारतज्ज्ञ डॉक्टर चारू अरोरा सांगतात की, कोथिंबीर हा एक अतिशय उपयुक्त पदार्थ असून, त्यामुळे चांगल्या आरोग्यास प्रोत्साहन मिळते. कोथिंबिरीच्या पानांपासून बनविलेला कोथिंबिरीचा रस अनेक आरोग्यदायी फायदे देतो; पण अरोरा सांगतात की, कोथिंबिरीच्या रसाला आपण संतुलित आहार आणि शिस्तबद्ध जीवनशैलीचा भाग बनविले पाहिजे. त्याचे काही फायदे खालीलप्रमाणे :



१. कोथिंबिरीचा रस प्यायल्याने आतडी निरोगी राहतात आणि पचनक्रिया सुधारते. गॅस आणि अपचन यांसारख्या समस्या दूर होतात.

२. या रसामुळे शरीरातील विषाक्त घटक बाहेर पडतात.

३. कोथिंबिरीच्या रसामध्ये दाहकविरोधी आणि जीवाणूवाढीस प्रतिबंध करणारे गुणधर्म असल्यामुळे चेहऱ्यावरील मुरमे कमी होतात आणि त्वचा चमकदार होते.

४. कोथिंबिरीच्या रसामध्ये व्हिटॅमिन ए, सी व के यांचे प्रमाण अधिक असल्यामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढते. त्यामुळे शरीराला आजाराचा सामना करण्यास बळ मिळते.

५. या रसाच्या सेवनाने प्री-डायबेटीज आणि इन्सुलिन प्रतिरोधक असलेल्या लोकांना रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

६. तसेच, कोथिंबिरीच्या रसाने कोलेस्ट्रॉल आणि रक्तदाब कमी करता येतो. हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित आरोग्य चांगले राहते.

७. हा रस प्यायल्याने चयापचय क्रिया व पचनक्रिया सुधारते. जर कोथिंबिरीचा रस संतुलित आहाराचा भाग बनविल्यास वजन कमी करण्यासाठीही मदत करतो.

८. ज्या लोकांना निद्रानाश किंवा झोपेशी संबंधित समस्या असेल, त्या रसाच्या सेवनाने त्या लोकांची झोपेची गुणवत्ता सुधारते.

९. तसेच ज्या लोकांना संधिवात, स्नायूंच्या दुखण्याचा त्रास असणाऱ्यांना या रसामुळे आराम मिळतो.

अरोरा पुढे सांगतात की, नियमित कोथिंबिरीचा रस पिणेसुद्धा धोकादायक ठरू शकते. त्यानुसार नियमित कोथिंबिरीचा रस पिण्यामुळे होणारे त्रास खालीलप्रमाणे :

ॲलर्जीची लक्षणे - कोथिंबीर रसाच्या नियमित सेवनाने त्वचेवर पुरळ येणे, श्वास घेण्यास त्रास होणे किंवा पोट खराब होणे यांसारखी ॲलर्जीची लक्षणे दिसू शकतात.

कमी रक्तदाब - या रसाच्या नियमित सेवनाने रक्तदाब मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. अतिप्रमाणात डिटॉक्सिफिकेशन - या रसाच्या नियमित सेवनाने अतिप्रमाणात डिटॉक्सिफिकेशन होऊ शकते. त्यामुळे विषाक्त घटकांसह शरीरास उपयुक्त असलेली काही आवश्यक खनिजे किंवा इलेक्ट्रोलाइट्ससुद्धा कमी होऊ शकतात. किडनीच्या कार्यक्षमतेवर परिणाम - कोथिंबीर हा लघवीचे प्रमाण वाढविणारा पदार्थ आहे. कोथिंबिरीचा रस किडनीला अधिक पाणी आणि मीठ उत्सर्जित करण्यास उत्तेजित करतो. त्यामुळे किडनीवर ताण येतो आणि तुमच्या शरीरातील इलेक्ट्रोलाइट्स असंतुलित होऊ शकतात.

# सर्वांच्या उज्वल भविष्यासाठी प्रत्येकांनी आपली जबाबदारी म्हणून मतदान करावे

## गट शिक्षणाधिकारी तथा स्वीप कक्ष प्रमुख गंगाधर राठोड



किनवट/शेख शौकत :-आपलं भविष्य चांगलं करायचं असेल तर आपण व परिवारातील सर्व मतदारांना मतदान करायला प्रवृत्त करा. मतदान न केल्याने चुकीच्या व्यक्ती सत्तेत बसतात. तेव्हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आपल्या राज्याच्या व देशाच्या सर्वोच्चपदी विराजमान होणाऱ्या व्यक्तीला देखील आपलं ऐकावं लागेल यासाठी प्रत्येकांनी मतदान करावे. असे प्रतिपादन गट शिक्षणाधिकारी तथा स्वीप कक्ष प्रमुख गंगाधर राठोड यांनी केले. ८३- किनवट मतदार संघात मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी सहायक जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना यांच्या मार्गदर्शनाखाली येथील बळीराम पाटील महाविद्यालयात मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याच्या शुभारंभी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एस. के. बेंबरेकर अध्यक्षस्थानी होते. यावेळी संपादक साजीद बडगुजर, पत्रकार आशिष देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वीप कक्षाचे शाहीर प्रो. डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी पोवाडा सादर केला. गट शिक्षणाधिकारी तथा स्वीप कक्ष प्रमुख गंगाधर राठोड यांनी सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना मतदान शपथ दिली. याप्रसंगी स्वीप कक्षाचे सर्व सदस्य केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे, रुपेश मुनेश्वर, भूमच्या इंदुरवार, सुरेश पाटील, सारंग घुले, सचिन कोंडापलकुलवार, सूरज पाटील, यांचे सह डॉ. शुभांगी दिवे, डॉ. सुलोचना जाधव, प्रा. शेषराव माने, डॉ.लता पेंडलवाड, डॉ. गजानन वानखेडे, डॉ. स्वाती कुरमे, प्रा. अनिल पाटील, प्रा. ज्ञानेश्वर चाटे, प्रा.मुकाडे, प्रा.अनिल मुंढे, कार्यालयीन अधीक्षक यमुना कुमरे, दीपक खंदारे, मिलिंद लोकडे, सुधीर पाटील आदी उपस्थित होते. स्वीप कक्षाचे सदस्य उपप्राचार्य डॉ. पंजाब शेरे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. कार्यक्रमास नवमतदांसह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.गट शिक्षणाधिकारी तथा स्वीप कक्ष प्रमुख गंगाधर राठोड यांनी सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना मतदान शपथ दिली. याप्रसंगी स्वीप कक्षाचे सर्व सदस्य केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे, रुपेश मुनेश्वर, भूमच्या इंदुरवार, सुरेश पाटील, सारंग घुले, सचिन कोंडापलकुलवार, सूरज पाटील, यांचे सह डॉ. शुभांगी दिवे, डॉ. सुलोचना जाधव, प्रा. शेषराव माने, डॉ.लता पेंडलवाड, डॉ. गजानन वानखेडे, डॉ. स्वाती कुरमे, प्रा. अनिल पाटील, प्रा. ज्ञानेश्वर चाटे, प्रा.मुकाडे, प्रा.अनिल मुंढे, कार्यालयीन अधीक्षक यमुना कुमरे, दीपक खंदारे, मिलिंद लोकडे, सुधीर पाटील आदी उपस्थित होते. स्वीप कक्षाचे सदस्य उपप्राचार्य डॉ. पंजाब शेरे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. कार्यक्रमास नवमतदांसह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# मराठवाडा ओबीसी भटके विमुक्त आघाडी प्रभारी म्हणून प्रा.बिभीषेन पाळवदे यांची निवड

केज/तात्या गवळी भारतीय जनता पार्टीने विधानसभा निवडणुकीसाठी सदर नियुक्ती केली आहे. आगामी काळात होऊ लागलेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप सरकार परत एकदा सत्तेवर येण्यासाठी भारतीय जनतापार्टी व्हीजेएनटी प्रदेशअध्यक्ष मा. राहुल भैय्या केंद्रे यांनी विधानसभानिवडणूक २०२४ च्या कार्याकरिता भारतीय जनता पार्टी भटके विमुक्त आघाडी महाराष्ट्र प्रदेशाची संघटनात्मक मराठवाडा विभागासाठी गेली, वीस वर्षे झाली मराठवाड्यात पक्षासाठी सतत काम करणारे, प्रा. बिभीषण पाळवदे यांची निवड केली आहे. पक्षाचे विचार तळागाळापर्यंतपोहोचवण्यासाठी आणि सरकारी लोक कल्याणकारी योजनांचा लाभ कशाप्रकारे झाला. यासाठी खूप मदत होणार असून येणा-या काळात ही भाजप सरकार स्थापन करण्यासाठी भाजप पुरस्करत उमेदवार मोठ्या फरकाने विजयी करावे असं आवाहन मराठवाडा प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेले प्रा. बिभीषण पाळवदे यांनी केले आहे.त्यांना सहप्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेल्या पदाधिकारी यांची साथ लाभणार आहे. त्यांच्या या निवडीबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले असून संपूर्ण मराठवाड्यात त्यांची एक छाप असून त्याचा फायदा भारतीय जनता पार्टीला जरूर मिळणार आहे. असा दावाही करण्यात येत आहे. पक्षाशी एकनिष्ठ असलेले व्यक्ती म्हणून त्यांची राजकीय वर्तुळात ओळख असून गत पंचवीस वर्षापासून ते भाजपात सक्रियआहेत. एक अनुभवी व्यक्तीमत्व, राजकारणाचा तसेच समाजकारणाचे गाढे अभ्यासक म्हणूनही त्यांना ओळखले जाते. परिणामी भटक्या विमुक्त आघाडीची टीम आता त्यांच्यासोबत सक्रिय राहून मराठवाडाभर दौ-याच्या माध्यमातून प्रचाराला सुरुवात करणार अशी ग्वाही त्यांनी सूत्रांना दिली आहे.



# माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या उपस्थितीत रेनापुरच्या भाजपा पदाधिकाऱ्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

### पनगेश्वर साखर कारखान्याचे संचालक सूरेश लहाने,सभापति दिलीप गोटके, सुग्रीव मुंढे, नगरसेवक गजेंद्र चव्हाण यांच्यासह वंजारी समाजाच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश



लातूर / प्रतिनिधी :- आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रेणापूर तालुक्यांतील भाजपचे नेते तथा पणगेश्वर साखर कारखान्याचे संचालक व लातूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सुरेश लहाने यांच्यासह रेनापुर पंचायत समितीचे माजी सभापती दिलीप घोडके वंजारी सेवा संघाचे महाराष्ट्राचे संपर्कप्रमुख सुग्रीव मुंडे, रेणापूर नगर पंचायतीचे भाजपचे नगरसेवक गटनेते गजेंद्र चव्हाण, माजी सरपंच गोविन्द नागरगोजे, सुरेश केंद्रे, वंजारवाडीचे पोलीस पाटील सीताराम केदार,रमेश केंद्रे वैजनाथ लहाने जीवा पैलवान यांच्यासह अनेक भाजपा पदाधिकाऱ्यांनी सोमवारी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या उपस्तित्तीत आशियाना निवासस्थानी काँग्रेसमध्ये प्रवेश केला असून सर्व भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते यांचे दिलीपराव देशमुख यांनी स्वागत केले आहे या भाजपा नेत्यांच्या प्रवेशामुळे रेणापूर तालुक्यांतील भाजपला मोठे भगदाड पडले आहे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर या प्रवेशाने कोंग्रेसचे ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार आमदार धीरज विलासरावजी देशमुख व काँग्रेस पक्षाची ताकत वाढणार असल्याचे चित्र यावेळी दिसत होते यावेळी राज्य साखर महासंघाचे सदस्य आबासाहेब पाटील जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, जिल्हा कोंग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल्य उटगे, पंचायत समितीचे माजी उपसभापती अप्पासाहेब मुंडे, रेणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा संचालक यशवंतराव पाटील रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष सर्जेराव मोरे,जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष कोंग्रेसचे तालुकाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, रेणापूर बाजार समितीचे माजी सभापती चंद्रचुड चव्हान ,जनार्दन वंगवाड, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शामराव भोसले, अँड बाबासाहेब गायकवाड, अभिजित चव्हाण, रेणा चे संचालक डॉ हरिदास यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.. भविष्याचा विकासाचा वेध घेवून आम्ही काँग्रेसकडे आलोय जुनी भाजप राहिली नाही सुरेश लहाने यांची प्रतिक्रिया लातूर जिल्ह्याची विकासाकडे वाटचाल सुरू आहे मागील काळात लोकनेते विलासराव देशमुख साहेब माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब माजी मंत्री मंत्री अमीत देशमुख आपले आमदार धीरज देशमुख यांनी या भागात अतिशय चांगल काम केले आहे भविष्यात चांगले काम करतील रेणापूर तालुक्यांतील विकासाची कामे काँग्रेस पक्ष करू शकतो देशमुख परिवार यांच्या नेतृत्वाखाली या भागाचा भविष्यात विकास होऊ शकतो यासाठी आम्ही सर्वांनी भाजपा सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला असे सांगून आम्ही भाजपमध्ये भाजपचे नेते गोपीनाथ मुंडे यांच्यासोबत कार्य केले जूने लोक आता भाजप मध्ये राहिलेले नाहीत त्यामुळे हळूहळू लोक बाहेर पडतील अशी माहिती भाजपचे जेष्ठ नेते पनगेश्वर शुगर कारखान्याचे संचालक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश लहाने यांनी यावेळी बोलताना दिली

# बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या प्रभारी अध्यक्ष पदी राहुल सोनवणे



केज/तात्या गवळी बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या प्रभारी जिल्हा अध्यक्ष पदी काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राहुल सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे पत्र महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी चे उपाध्यक्ष नाना गवांडे दिले.

मागच्या दोन दिवसापूर्वीच जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचेकडे आपला राजीनामा दिला होता त्या अनुषंगाने दि.२७ रोजी बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या प्रभारी जिल्हा अध्यक्ष पदावर उपाध्यक्ष राहुल सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राहुल सोनवणे हे विद्यार्थी दशेपासून काँग्रेस मद्ये काम करत आहेत एन एस यु आय चे प्रदेश सरचिटणीस या सह जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्ष पदावर देखील त्यांनी काम पाहिले आहे. उच्च शिक्षित, संयमी व सुस्कृत राजकारणी म्हणून त्यांची जिल्ह्यात ओळख आहे. त्यांच्या या निवडीबद्दल काँग्रेसच्या नेत्या खा.सौ. रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोक पाटील, आदित्य पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# युवा सेनेच्या तालुका प्रमुखपदी सुग्रीव सक्राते यांची निवड



केज/तात्या गवळी मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे व खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या आदेशाने युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक यांनी बीड जिल्ह्यातील परळी,अंबाजोगाई, केज विभागाचे पदाधिकारी जाहीर केले असून शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक व अनिल दादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार केज तालुका शिवसेनेच्या वतीने युवा सेनेचे नवनिर्वाचित तालुकाप्रमुख सुग्रीव सक्राते, शहर प्रमुखपदी आकाश चाळक यांचा केज शिवसेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख पंजाबराजे देशमुख,शहर प्रमुख बाळासाहेब पवार,शहर प्रमुख वैशालीताई सांगळे,उपतालुका प्रमुख तानाजी धस,उपतालुका प्रमुख महेंद्र चाटे,उपतालुका प्रमुख चंद्रकांत इंगळे,विभाग प्रमुख दत्ता काकडे,विभाग प्रमुख शहाजी बहिर, शिवसैनिक विलास घुले,उमेश माने,उमेश डोईफोडे,सोमनाथ हिरवे,अशोक धुमक,अमोल पवार व इतर शिवसैनिक हजर होते.

# उदगीरच्या जनतेने मला राजकीय जन्म दिला : क्रीडामंत्री संजय बनसोडे




उदगीर / बाबासाहेब मादळे :- माझ्या आई-वडिलांनी मला जन्माला घातले, मात्र माझ्या राजकीय कारकीर्दीत मला आमदारकी, मंत्रीपद मिळवून देत उदगीरच्या जनतेने माझा राजकीय जन्म दिला असून या भागाच्या विकासासाठी मी आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत काम करणार असल्याची ग्वाही राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी दिली. ते उदगीर शहरातील ब्राम्हण गल्लीतील श्री सिध्दरामेश्वर मंदिराच्या सभागृहात ना. संजय बनसोडे यांनी या भागातील जनतेशी संवाद साधला. यावेळी प्रा. महेश बसपूरे, शिवसेनेचे कैलास पाटील, रामलिंग झुंगा, धोंडिबा मोरे, बंडू धोंगडे, महेश पोकाळे, संगीता बदनाळे, प्रकाश पारसेवार, मल्लिकार्जुन स्वामी हडोळतीकर, प्रा. मल्लेश झुंगा, महेश झुंगा आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना ना. संजय बनसोडे म्हणाले की, आजचा दिवस माझ्यासाठी ऊर्जा देणारा आहे. आपण सोमवारी विधानसभा निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहोत. त्यापूर्वी श्री सिध्दरामेश्वरांचा आशिर्वाद घ्यावा, या भागातील जनतेशी संवाद साधावा यासाठी आपण आलो असल्याचे सांगत त्यांनी मागच्या पाच वर्षाच्या काळात उदगीरचा लोकप्रतिनिधी म्हणून काम करत असताना जनतेशी प्रामाणिक राहून काम केले असल्याचे सांगितले. मागच्या पाच वर्षात उदगीर विधानसभा मतदारसंघाचा आपण कायापालट केला असून या भागात दळणवळण, ऊर्जा, आरोग्य, सिंचन अशा विविध क्षेत्रातील विकासाला चालना देण्याचे काम केले आहे. उदगीरला जिल्हा करण्यासाठी आपला प्राधान्याने प्रयत्न राहिला असून त्यादृष्टीने आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्यासारख्या एका सामान्य कुटूंबातील कार्यकर्त्याला या भागातील जनतेने आमदार होण्याची संधी दिली. त्याचा पुरेपूर फायदा जनतेसाठी केला असल्याचेही ते यावेळी म्हणाले. कोरोना काळात या भागाचा लोकप्रतिनिधी म्हणून काम करत असताना या भागातील जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्याचे काम केले. आगामी काळात या भागाच्या विकासाला आणखी चालना मिळावी याकरीता एम.आय.डी. सी, मेडिकल कॉलेज, विमानतळ असे नवीन प्रकल्प उभे करण्यासाठी आपण काम करणार आहोत. अशक्य त्या गोष्टी आपण पाच वर्षात पुर्ण करून दाखवत आपण या भागाचा सर्वांगीण विकास साधला असून येत्या २८ ऑक्टोबर रोजी विधानसभा निवडणूकीसाठी महायुतीच्या वतीने मी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहोत. यासाठी या भागातील जनतेने मोठ्या संख्येनी उपस्थित राहून माझ्या विजयासाठी आशीर्वाद द्यावेत असे आवाहनही यावेळी ना. संजय बनसोडे यांनी केले. यावेळी ब्राम्हण गल्ली, गवळी गल्ली, मुक्कावर गल्ली, सोनार गल्ली, पारकट्टी गल्ली, होळी चौक, बालाजी मंदिर परिसर आदी भागातील महिला पुरूष मोठ्या संख्येनी उपस्थिती होते.

# किनवट तालुक्यातील खरीप हंगामाची पैसेवारी ४८ पैसे अतिवृष्टी व पूरामुळे मूग, उडीद, सोयाबीनसह कपाशीचे अतोनात नुकसान

किनवट/शेख शौकत :-खरीप हंगामाच्या उत्पादनाचे प्राथमिक चित्र स्पष्ट करणारी किनवट तालुक्यातील १९१ गावांमधील नजरअंदाज पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. खरीपात अतोनात नुकसान सोसलेल्या शेतकऱ्यांच्या अपेक्षेप्रमाणे ५० पैशाच्या आत अर्थात सरासरी ४८ पैसे आली आहे. अंतिम पैसेवारी घोषित झाल्यानंतरच शासनाच्या दुष्काळ विषयक धोरणाचा लाभ मिळू शकत असल्याने, शेतकऱ्यांची डोळे आता शासकीय मदतीकडे लागले आहेत तालुक्यात पावसाने वार्षिक सरासरी मागेच ओलांडली असून, आजपर्यंत सरासरी ११८० मि.मी. पाऊस पडला आहे. त्याची टक्केवारी १११ इतकी आहे. तालुक्यात यंदाच्या पावसाळ्यात जुलैमध्ये ३ वेळेस तर सप्टेंबरमध्ये ३ असे सहा वेळेस अतिवृष्टी झाली. १ सप्टेंबरला तर सर्वच मंडळात ढगफुटीसदृश पाऊस पडून खरीपातील सर्वच पिकांचे अतोनात नुकसान झाले. त्यातून कसेबसे वाचलेल्या पिकांवर ढगाळ वातावरणामुळे कीड व रोगांचा प्रादुर्भाव होऊन कपाशीची वाढ खुंटली तर मूग, उडीद, सोयाबीनच्या उत्पादनात फार मोठी घट आलेली आहे. त्यात परतीच्या पावसानेही कहर करून अनेक भागातील पिकांची दाणादाण उडविली आहे. सुरुवातीलाच नजर हंगाम पैसेवारी ही ५० पैशाच्या आत आल्यामुळे ३१ ऑक्टोबर रोजी जाहीर होणारी सुधारित पैसेवारी आणि १५ डिसेंबरला घोषित होणारी अंतिम पैसेवारीत बदल होण्याची शक्यता सूतराम नाही. तीसुद्धा ५० पैशाच्या आतच असणे अपेक्षित आहे. अंतिम पैसेवारीत ज्या गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी येते, त्या गावांत शासनातर्फे दुष्काळी सवलती जाहीर केल्या जातात म्हणून शेतकऱ्यांना आता अंतिम पैसेवारी घोषित होण्याची प्रतिक्षा आहे. किनवट तालुक्यातील खरीप हंगामात प्रत्यक्षात पेरणी झालेले क्षेत्र ७९ हजार ०७७ हेक्टर आहे. किनवट तालुक्यात ९ महसूल मंडळे असून, प्रथम महसूल मंडळाचे नाव, मग त्या मंडळामध्ये पेरणी झालेले



क्षेत्र हेक्टरमध्ये व पुढे कंसात त्या मंडळात निघालेली सरासरी नजर अंदाज पैसेवारीची संख्या पुढील प्रमाणे: किनवट ६ हजार ८२९ हेक्टर (४९ पैसे); बोधडी (बु.)-१० हजार ६३२ हेक्टर ((४८ पैसे); दहेली- ७ हजार ३४९ हेक्टर (४७ पैसे); मांडवी- ८ हजार २४१ हेक्टर (४८ पैसे); उमरी (बा.)- ८ हजार ५९६ हेक्टर (४७.६४ पैसे); जलधरा- ९ हजार ३३५ हेक्टर (४९ पैसे); इस्लापूर ११ हजार ५६१ हेक्टर (४८पैसे); शिवणी ८ हजार ३८७ हेक्टर (४७.४ पैसे); सिदगी (मो.)- ८ हजार २५१ हेक्टर (४७ पैसे)

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE